**Young Researcher**
Peer Reviewed | International | Open Access Journal
**ISSN: 2277-7911** | *Website: https://yra.ijaar.co.in/* | ***Volume-14, Issue-2*** |
***April - May – June 2025***

**Original Article**

# संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ एक आर्थिक विश्लेषण २०१५ – २०२५

प्रा. विनायक रामचंद्र वसईकर , प्रा. डॉ. पंकज साहेबराव पाटील

*सहाय्यक प्राध्यापक, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नवापूर जि. नंदुरबार*

*सहाय्यक प्राध्यापक, कला वाणिज्य व विज्ञानमहाविद्यालय, साक्री जि. धुळे*

**Manuscript ID:**
yrj-140217

**ISSN: 2277-7911**
**Impact Factor – 5.958**

**Volume 14**
**Issue 2**
**April-May-June 2025**
**Pp. 129-134**

**Submitted:** 09 June 2025
**Revised:** 18 June 2025
**Accepted:** 21 June 2025
**Published:** 26 June 2025

***Corresponding Author:***
***प्रा. विनायक रामचंद्र वसईकर***

Quick Response Code:

Web. https://yra.ijaar.co.in/

DOI:
10.5281/zenodo.16757532

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.16757532

Creative Commons

OPEN ACCESS

**सारांश:**

भारतातील दलित समाजाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत समस्या होत्या. त्याचबरोबर शिक्षण, स्वातंत्र्य व समान अधिकार याविषयी दलित समाज अनभिज्ञ होता. २६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधान अमलात आले व आधुनिक भारतात समाजसुधारणेचे व विकासाचे नवीन पर्व सुरू झाले. भारत सरकारने अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा आर्थिक व सामाजिक विकास होण्याकरिता घटनात्मक तरतूद केली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या विकासासाठी भारतीय राज्यघटनेने आरक्षण दिलेले आहे. 1956 च्या अधिनियम कंपनी कायदा नुसार भारतातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, राष्ट्रीय अल्पसंख्यांक समाज, इतर मागासवर्गीय घटक, अपंग व दृष्टिहीन समूह तसेच सफाई कामगार यांच्या आर्थिक व सामाजिक सुधारणासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या कायद्यानुसार अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांसाठी वेगवेगळ्या प्रकारची महामंडळे स्थापन करण्यात आली.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*प्रा. विनायक रामचंद्र वसईकर , प्रा. डॉ. पंकज साहेबराव पाटील (2025). संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ एक आर्थिक विश्लेषण २०१५ – २०२५. Young Researcher, 14(2), 129-134.*
*https://doi.org/10.5281/zenodo.16757532*

## प्रस्तावना:

भारत देश हा विविध धर्म, पंथ, जात, परंपरा व संस्कृतीने नटलेला आहे. भारतात विविध धर्मानुसार सामाजिक रूढी व परंपरा दिसून येतात. भारतीय संस्कृती ही प्राचीन संस्कृती आहे. प्राचीन समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही वर्णव्यवस्था अस्तित्वात होती. या वर्णव्यवस्थेचा समाज जीवनावर व धर्मावर परिणाम झालेला दिसून

येतो. वर्णव्यवस्थेनुसार समाजातील कामाचे वाटप व सामाजिक दर्जा बहाल केलेला दिसून येतो. ब्राह्मण वर्गाला धर्माचा प्रसार व प्रचार करणे, क्षत्रियांनी समाजाचे संरक्षण करणे, वैश्यांनी व्यापार करणे आणि शूद्र वर्गाला समाजाची सेवा करणे अशी कामाची रचना केलेली दिसून येते. मनुस्मृतीनुसार शूद्र वर्गाला हीन व निच्च वर्गाचे स्थान देण्यात आले. त्यांना अस्पृश्य समजले जात . शुद्रांना धर्म शिक्षण व सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्यही देण्यात आलेले नव्हते. त्यामुळे या समाजाला वर्षानुवर्ष अन्याय व अत्याचार सहन करावा लागला. त्यामुळे हा समाज शिक्षण, स्वातंत्र्य, समता, बंधुता यापासून अनभिज्ञ होता. भारत स्वतंत्र होईपर्यंत समाजात अनेक सुधारणा होत गेल्या. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्य समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी बरेच प्रयत्न केले. २६ जानेवारी १९५० ला भारतीय संविधानानुसार भारतीय समाजात सुधारणेचे व प्रगतीचे वारे वाहू लागले. अस्पृश्य समाजातील बेरोजगारी व बेकारी दूर करण्यासाठी १९५६ च्या कंपनी कायद्यांतर्गत भारतातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, राष्ट्रीय अल्पसंख्यांक समाज (मुस्लिम, शेख, बौद्ध, पारसी) इतर मागासवर्गीय घटक, अपंग व दृष्टिहीन समूह तसेच सफाई कामगार यांच्या आर्थिक व सामाजिक सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. या सर्वांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी भारतात खालील मंडळाची स्थापना करण्यात आली.

१. राष्ट्रीय अनुसूचित जाती आर्थिक विकास महामंडळ
२. राष्ट्रीय इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ
३. राष्ट्रीय अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ
४. राष्ट्रीय अपंग आर्थिक विकास महामंडळ

**राष्ट्रीय सफाई कामगार आर्थिक विकास महामंडळ:**

१९५६ च्या कंपनी कायद्यानुसार महाराष्ट्र राज्यातही मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी खालील महामंडळाची स्थापना करण्यात आली.

१. महाराष्ट्र राज्य खादी ग्राम उद्योग आर्थिक विकास महामंडळ
२. वसंतराव नाईक विमुक्त भटक्या जाती आर्थिक विकास महामंडळ
३. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ
४. इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ
५. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ
६. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आर्थिक विकास महामंडळ
७. शबरी आदिवासी आर्थिक विकास महामंडळ
८. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ
९. महिला आर्थिक विकास महामंडळ
१०. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ
११. महात्मा फुले मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ

या महामंडळांनी विविध प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी करून अस्पृश्य व

मागासवर्गीय घटकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाला हातभार लावलेला दिसून येतो.

**संशोधन उद्दिष्टे**:

१. महाराष्ट्रातील विविध विकास महामंडळाचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्रातील संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**:

प्रस्तुत संशोधनात द्वितीयक माहिती स्रोतांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ**:

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील चर्मकार समाजाच्या आर्थिक विकासासाठी १ मे १९७४ रोजी १९५६ च्या कंपनी कायद्यानुसार महाराष्ट्राच्या महोद्योग विकास महामंडळ या महामंडळाची स्थापना केली. त्यानंतर २ जानेवारी २००३ च्या शासन निर्णयानुसार या महामंडळाचे नाव संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित असे करण्यात आले. या महामंडळाचे संपूर्ण प्रशासकीय नियंत्रण महाराष्ट्र सामाजिक व न्याय विभागाकडे देण्यात आले. चर्मकार समाजातील लोक आपला उदारनिर्वाह करण्यासाठी पारंपारिक व्यवसाय करतात. उदा. चामडे रंगविणे, कातडी सोलणे, चपला व बूट बनविणे, इ. परंतु जागतिकीकरणाच्या काळात आधुनिकीकरणामुळे पारंपारिक व्यवसाय बंद पडताना दिसत आहे. त्यामुळे चर्मकार समाजाला बेरोजगारी व दारिद्र्याला सामोरे जावे लागत आहे. भांडवलाच्या अभावी त्यांना आपल्या व्यवसायात आधुनिकता आणता येत नाही. त्यामुळे या महामंडळाची भूमिका चर्मकार समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची उद्दिष्टे**:

१. राज्यामध्ये चर्म उद्योगाचा विकास करणे.

२. अनुसूचित जातीमधील चर्म उद्योगातील कारागिरांचा विकास करणे.

३. चर्म उद्योगातील तंत्रज्ञान विकसित करणे.

४. चर्म वस्तुंसाठी बाजारपेठ निर्माण करणे.

५. चर्म उद्योगांना प्रोत्साहन देणे.

६. राज्यातील चर्म उद्योग विकासाला चालना देणे.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या योजना**

**१. ५० टक्के अनुदान योजना**:

५० टक्के अनुदान योजनेमध्ये चर्मकार समाजातील व्यक्तींना राष्ट्रीयकृत बँकेमधून ५०,००० रुपये कर्ज उपलब्ध करून दिले जाते. या कर्जाच्या रकमेपैकी जास्तीत जास्त १०,००० रुपये पर्यंत ५० टक्के रक्कम महामंडळाकडून अनुदान म्हणून दिले जाते.

**२. बीज भांडवल योजना** :

५०,००१ ते ५,००,००० पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या कोणत्याही व्यवसायासाठी या योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेमार्फत सवलतीच्या व्याजदराने कर्जपुरवठा केला जातो. या योजनेअंतर्गत बँकेने मंजूर केलेले कर्ज रकमेपैकी ७५ टक्के कर्ज रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते तर ५

टक्के रक्कम ही लाभार्थ्यांनी स्वतः डिपॉझिट म्हणून बँकेकडे जमा करावयाची असते.

**३. गटई स्टॉल योजना** :

रस्त्याच्या कडेला गटई काम करणारे मोचीसाठी महामंडळांनी ही योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत गटई काम करण्यासाठी ४x५x६.५ आकाराचा गटई स्टॉल उपलब्ध करून देण्यात येतो.

**४. प्रशिक्षण योजना** :

चर्मकार समाजाच्या लाभार्थ्यांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी विविध व्यावसायिक ट्रेडचे शासन मान्यताप्त संस्थेमार्फत ३ ते ६ महिन्याच्या कालावधीपर्यंत मोफत प्रशिक्षण देण्यात येते. तसेच प्रशिक्षणार्थ्यास दरमहा ३०० ते ४०० रुपयांपर्यंत विद्या वेतन देण्यात येते. या योजनेत पुढील व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते. शिवणकला, ब्युटी पार्लर, इलेक्ट्रिक वायरमन, टर्नर/फिटर, मशीन वर स्वेटर विणणारे, खेळणी बनविणे, टीव्ही, रेडिओ, टेप रेकॉर्डर मेकॅनिक, संगणक प्रशिक्षण, मोटार वाइंडिंग, फॅब्रिकेटर बिल्डिंग, ऑटोमोबाईल रिपेरिंग, (टू व्हीलर थ्री व्हीलर फोर व्हीलर), वाहत चालक, चर्मोद्योग पादत्राणे उत्पादन, चर्मोद्योग चर्म वस्तू उत्पादन इ.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र शासनाच्या योजना:**

**१. मुदती कर्ज योजना**:

या योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरिता एन. एस. एफ. डी. सी. नवी दिल्ली यांचे मार्फत १ ते २.५ लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसाय प्रकल्पांना मुदती कर्ज दिले जाते. यामध्ये मंजूर केलेले खर्चापैकी एन. एस. एफ. डी. सी. नवी दिल्ली यांचा सहभाग ७५ टक्के, महामंडळाचा सहभाग २० टक्के (रु १०००० अनुदानासहित) व लाभार्थी सहभाग ५ टक्क्यांपर्यंत असतो.

**२. सूक्ष्मपत पुरवठा योजना**:

चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना ५ टक्के व्याजदराने २५००० ते ५०००० रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. त्यापैकी १०००० रुपये इतके अनुदान दिले जाते.

**३. महिला समृद्धी योजना**:

चर्मकार समाजातील विधवा, परित्यक्ता, निराधार महिलांना या योजनेअंतर्गत ४ टक्के व्याजदराने २५००० ते ५०००० रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. त्यापैकी १०००० रुपये इतके अनुदान दिले जाते.

**४. महिला किसान योजना**:

या योजनेअंतर्गत ज्या महिलांच्या नावावर शेत जमिनीचा सातबारा उतारा आहे किंवा पती-पत्नी या दोघांच्या नावावर सातबारा उतारा आहे. अशा व्यक्तींना शेतीपूरक व्यवसायासाठी ५०००० रुपये ५ टक्के व्याजदराने कर्ज देण्यात येते त्यापैकी १०००० रुपये इतके अनुदान दिले जाते.

**५. शैक्षणिक कर्ज योजना:**

चर्मकार समाजातील विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाकरिता सन २००९-१० या आर्थिक वर्षापासून लागू करण्यात आलेली आहे. भारतामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास १०,०००,०० व परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास २०,०००,०० पर्यंत कर्ज घेण्याची मर्यादा आहे.

Young Researcher
Peer Reviewed | International | Open Access Journal
ISSN: 2277-7911 | *Website: https://yra.ijaar.co.in/* | ***Volume-14, Issue-2 |***
***April - May – June 2025***

**६. नारी आर्थिक सशक्तिकरण योजना:**

एन. एस. एफ. डी. सी. नवी दिल्ली यांनी दिनांक ८ फेब्रुवारी २०१४ पासून ही योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत २५ ते ५० वयोगटातील विधवा, घटस्फोटीत, निराधार महिलांना १ ते २ लाखापर्यंत ४ % व्याजदराने लाभ दिला जातो.

**७. व्होकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग लोन योजना:**

एन. एस. एफ. डी. सी. नवी दिल्ली यांनी दिनांक ८ फेब्रुवारी २०१४ पासून ही योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत अध्ययन, अभ्यासक्रम व प्रशिक्षण कालावधी ६ महिन्यापासून ते २ वर्षापर्यंत असून ४ % व्याजदर आणि रुपये १ ते १.५० लाखापर्यंत कर्ज देण्यात येते.

**६. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची उल्लेखनीय कामगिरी:**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील चर्मकार समाजाच्या आर्थिक विकासासाठी स्थापन केलेल्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची कामगिरी ही दिवसेंदिवस वाढतच गेलेली दिसून येते. या महामंडळाने चर्मकार समाजासाठी व उद्योगासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून चर्मकार समाजाच्या व व्यावसायिकांच्या प्रगतीसाठी मोठा हातभार लावलेला दिसून येतो. या महामंडळाच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजनांच्या अनुषंगाने चर्मकार समाजासाठी व व्यावसायिकांसाठी वेळोवेळी मदत केलेली दिसून येते. त्याची सविस्तर माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

| विकास महामंडळ | भाग भांडवल (हिस्सा) (रु.कोटी) | राज्य शासन | केंद्र शासन | लाभार्थी | आर्थिक सहाय्य (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ | १००० | १०० % | ०% | | |
| २०१५-१६ | | | | १४८० | १७०. ३९ |
| २०१६-१७ | | | | १८५४ | २३१. ०३ |
| २०१७-१८ | | | | २९९ | २७. ७० |
| २०१८-१९ | | | | ३१७ | ३५. ३० |
| २०१९-२० | | | | १९२ | २१. २२ |
| २०२०-२१ | | | | १४३ | १३. ७० |
| २०२१-२२ | | | | ७६ | ७. ५० |
| २०२२-२३ | | | | १२१ | ०. १२ |
| २०२३-२४ | | | | ३९६ | ४४. ४० |
| २०२४-२५ | | | | २९७ | ६६. ३८ |

**निष्कर्ष**:

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची स्थापनेपासूनची कामगिरी पाहता केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाने चर्मकार समाजाच्या व व्यावसायिकांच्या व्यावसायिक उन्नतीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केलेले दिसून येतात. सातत्याने गरजू व्यावसायिकांना वेळोवेळी आर्थिक सहाय्य केलेले दिसून येते. त्यातूनच चर्मकार व्यवसायाचा कायापालट होतांना दिसून येत आहे. त्यामुळे या महामंडळाची भूमिका चर्मकार समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**संदर्भसूची**:

१. कैलास सोनवणे, महाराष्ट्रातील चर्मकार समाजाचे राजकारण, नवीन उद्योग, पुणे.
२. डॉ. संजय सोनवणे, जाती संस्थेचा इतिहास, प्राजक्त प्रकाशन.
३. रमेश पतंगे, सामाजिक न्याय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर साप्ताहिक विवेक (हिंदुस्तान प्रकाशन संस्था) मुंबई.
४. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४-२५.
५. विविध संकेत स्थळे.
६. Economic Survey of Maharashtra २०२१-२२.
७. Economic Survey of Maharashtra २०१५-१६.
८. Economic Survey of Maharashtra २०१७-१८.
९. www.lidcom.in